# परिचर उमेदवारास विशेष सुचना

1) उमेदवाराने या प्रवेशपत्रावर तसेच पुरविण्यात येणाऱ्या उत्तरपत्रिकेवर दिलेल्या सुचना अत्यंत काळजीपुर्वक वाचुन आदेशाचे पालन करावे. सुचनांचे पालन न करणारा उमेदवार परिक्षा कक्षाबाहेर घालवुन त्याचे नांव निवड समितीच्या काळया यादीत समाविष्ट करुन त्यास निवड समितीच्या संबंधीत किंवा सर्व परिक्षा अथवा निवडीस प्रतिरोध करणे, अपात्र ठरविणे, उमेदवारी रद्द करणे यापैकी एक किंवा अधिक शिक्षा देण्यास पात्र ठरेल प्रकरण परत्वे शिक्षा देण्याचा अंतिम अधिकार सर्वस्वी निवड समितीचा असेल.

2) उमेदवाराने परिक्षा कक्षात परिक्षेच्या अर्धा तास अगोदर हजर राहणे आवश्यक आहे. हा कालावधी उमेदवाराचे प्रवेशपत्र तपासणे व हजेरी घेणे, उत्तर पत्रिकेतील माहिती भरणे यासाठी राहील. उत्तरे / माहिती भरण्यासाठी फक्त काळया शाईचा बॉल पेन वापरावा. दिलेल्या उत्तर पत्रिकेवर एकूण 100 प्रश्नांची उत्तरे लिहीण्याची सोय आहे. प्रश्न पुस्तीकेमध्ये सलग 100 प्रश्न असतील व या प्रश्नाची उत्तरे उत्तरपत्रिकेतील प्रश्न क्रमांक 1 ते 100 समोरील गोलात ● याप्रमाणे पूर्ण छायांकित करावीत. प्रत्येक उत्तरक्रमांकासमोर Ⓐ Ⓑ Ⓒ Ⓓ असे चार वर्तुळे दिली असून त्या वर्तूळात पर्यायी उत्तर दिले आहे. एका प्रश्नासाठी एका पेक्षा जास्ती पर्यायाची वर्तुळे छायांकित केल्यास त्या प्रश्नास गुण मिळणार नाही. तसेच अर्धवट भरलेली व खोडाखोड केलेली उत्तरे व ⊗ ◐ ⦿ ✓ शिस पेन्सीलने दिलेली उत्तरे तपासली जाणार नाही.

3) प्रश्नपत्रिकेचे स्वरुप पुढीलप्रमाणे राहील. इंग्रजी 50 गुण, मराठी 50 गुण, सामान्यज्ञान 50 गुण, अंकगणित 50 गुण. प्रश्नांचा दर्जा 12 वी पर्यंतचा राहील.

4) परिक्षा कालावधी 2.00 तासाचा असेल त्याप्रमाणे प्रत्यक्ष परिक्षा दुपारी 12.00 वाजता सुरु होईल. दुपारी 12.00 वाजेनंतर येणाऱ्या उमेदवारास कोणत्याही परिस्थितीत परिक्षा कक्षात प्रवेश देण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी. उमेदवारास परिक्षेसाठी स्वखर्चाने हजर रहावे लागेल.

5) परिक्षा सुरु झाल्यानंतर परिक्षा संपेपर्यंत कोणत्याही कारणासाठी परिक्षा कक्षाबाहेर जाता येणार नाही. कोणतीही वस्तु जसे पुस्तक किंवा वह्या उमेदवाराने स्वतःजवळ ठेवु नयेत. परिक्षेच्यावेळी परिगणकासारख्या ( Calculator ) साधनांचा उपयोग करण्यास सक्त मनाई आहे. उमेदवाराने डिजीटल डायरी, पेजर, मायक्रोफोन, घडयाळ, मोबाईल फोन इत्यादी सारखी इलेक्ट्रानिक्स साहित्ये परिक्षा केंद्रावर आणण्यास सक्त मनाई आहे. पांढरी शाई (Whitener) चा उपयोग करता येणार नाही.

6) परिक्षेच्यावेळी उमेदवारांना बॅग्ज, व इतर वस्तु, परिक्षा दालनात ठेवता येणार नाही. सदर बॅग्ज, वस्तु इत्यादी सामान परिक्षा दालनाबाहेर ठेवावे. बॅग्ज / वस्तु गहाळ झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवारांची राहील.

7) पेपर सुरु झाल्याची घंटा झाल्यानंतर उमेदवारांनी उत्तरे लिहीणे सुरु करावे. उमेदवारांनी केंद्र प्रमुख / पर्यवेक्षक / समवेक्षक आदी आणि निवड समिती याकडुन देण्यांत येणारे सुचनांचे पालन करणे आवश्यक राहील. तसेच निवड समितीने परिक्षेच्या कामासाठी नियुक्त केलेल्या कोणत्याही व्यक्तीस तपासणी करण्याचा अधिकार आहे. नियम बाह्य किंवा अनुचीत वर्तूणूकीबाबत दोषी असलेला उमेदवार परिक्षा कक्षाबाहेर घालविण्यास पात्र ठरेल. परिक्षा कक्षामध्ये चहापान, धुम्रपान करण्यास सक्त मनाई आहे.

8) उमेदवारास सदर परिक्षेस दिलेला प्रवेश अहर्ता तपासणीच्या अधिन राहुन तात्पुरता स्वरुपात दिलेला आहे. परिक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवाराची पात्रता अंतिम निकालापुर्वी किंवा त्यानंतर कधीही तपासता येईल. त्यावेळेस अपात्र असल्याचे आढळुन आल्यास त्याची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

9) उमेदवाराने आपला बैठक क्रमांक प्रश्न / उत्तर पत्रिकेवर विहीत केलेल्या जागी लिहावा. यात काही चुक झाल्यास त्याची जबाबदारी सदर उमेदवाराची राहील.

10) उमेदवाराने परिक्षेच्या वेळी हजेरीपटावरील नोंदी काळजीपुर्वक भराव्या तसेच हजेरी पटावर उमेदवारांनी केलेली सही ही उमेदवाराच्या परिक्षेच्या आवेदन पत्रावरिल सहीशी जुळणारी असावी. अन्यथा उमेदवारी रद्द करण्यात येईल.

11) परिक्षा कालावधी पुर्ण होण्यास 5 मिनिटे बाकी असतांना इशारा घंटा दिली जाईल. त्यानंतर परिक्षा संपल्याची अंतिम घंटा झाल्यावर उमेदवाराने उत्तरे लिहिणे लगेच थांबविले पाहिजे. सर्व उमेदवारांच्या उत्तर पत्रिका व प्रवेशपत्र समवेक्षकानी गोळा केल्यानंतर मोजुन त्यांचा हिशेब लागेपर्यंत उमेदवारांनी आपआपल्या जागेवर बसावे.

12) उमेदवारांनी सदर निवड प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा राजकिय अथवा बाह्य स्वरुपाचा दबाव आणल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

13) प्रवेशपत्रात दर्शविलेला प्रवर्ग उमेदवाराने तपासून घ्यावा व या प्रवेशपत्रात कोणत्याही प्रकारच्या त्रुटी आढळल्यास या संस्थेच्या कार्यालयाशी संपर्क साधून दुरुस्त करुन घ्यावा.

14) लेखी परीक्षा झाल्यानंतर त्याचदिवशी लेखी परीक्षेच्या आदर्श उत्तरपत्रिका भंडारा जिल्हा परिषद व पंचायत समिती कर्मचारी सहकारी संस्था मर्या. भंडारा र.नं. 134 यांचे कार्यालयात तसेच परीक्षा केंद्रावर सुचना फलकावर लावण्यात येईल. या आदर्श उत्तरपत्रिकेवर काही आक्षेप असल्यास उमेदवारांनी लेखी स्वरुपात सकारण दि.17/11/2025 ला दुपारी 12.00 वाजेपर्यंत भंडारा जिल्हा परिषद व पंचायत समिती कर्मचारी सहकारी संस्था मर्या. भंडारा र.नं. 134 यांचे कार्यालयात सादर करावेत यानंतर येणा-या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही.

15) दि. 17/11/2025 ला सायंकाळी 5.00 वाजेनंतर निकाल घोषीत करण्यांत येईल. निकालाची यादी भंडारा जिल्हा परिषद व पंचायत समिती कर्मचारी सहकारी संस्था मर्या. भंडारा र.नं. 134 यांचे कार्यालयात लावण्यात येईल.

This document was created with the Win2PDF “Print to PDF” printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/